सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४१२

**सांवरी वाढिन्नल्या सरळा। वरी फळ ना आंतु पोकळा ।**
**कां स्तन जाले गळां। शेळिये जैसे ।।**

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, आपण सर्व प्राणिमात्रात असतांनाही लोक मला प्राणिमात्रांपेक्षा वेगळे मानून नको त्या गोष्टी करत असतात. याचे सविस्तर विवेचन भगवंतांनी अर्जुनासाठी केले आहे. प्राणिमात्रात मला पाहायला पाहिजे पण तसे न पाहता, वेगळे पाहून वागणारे लोक अविचारी कर्म करीत असतात. मला योग्य ठिकाणी न पाहता, अयोग्य ठिकाणी पाहून कर्म करणारे लोक म्हणजे वर्षाऋतुवाचून आलेल्या ढगा प्रमाणे, किंवा मृगजळाप्रमाणे व्यर्थ असतात. कुंभाराने तयार केलेल्या घोडेस्वाराचा किंवा जादुने तयार केलेल्या अलंकाराचा व्यवहारात जसा उपयोग नसतो, तसे अशा अज्ञानी लोकांचे वागणे असते.



निवडुंगाचे झाड कधी सरळ वाढत नाही. पण कदाचित सरळ वाढलेच तर त्याच्या शेंडयाला फळही नसते, तसेच आतून ते पोकळ असते. जसे शेळीच्या गळयाला स्तन असतात, पण त्याचा काही उपयोग नसतो. कारण शेळीच्या गळयातील स्तनातून दुध निघत नाही. त्या प्रमाणे अव्यवहारी माणसाच्या बाबतीत घडते, याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले, **सांवरी वाढिन्नल्या सरळा । वरी फळ ना आंतु पोकळा।कां स्तन जाले गळां । शेळिये जैसे।।**. अर्थात, सावरीच्या झाडाला लवकर फळच येत नाही आणि आलेच तर काटे असल्याने ते कोणाला सहज काढून घेता येत नाही. त्याचबरोबर ते कडू असल्याने खाण्यासाठी म्हणून कोणाच्या उपयोगाला येत नाही. अगदी त्या प्रमाणे अशा माणसांचा हातून घडलेल्या कर्माचे असते. ते कोणाच्याही कामी येणारे नसते. अशा माणसांचे कर्म निव्वळ स्वार्थापोटी व अविवेकपणे केले गेल्याने ते व्यर्थ असतात.

अविचारी, अज्ञानी व्यक्ति कसे असतात या बाबत भगवंत अर्जुनाला सांगत आहेत. अविचारी माणसाचे ज्ञान कोणाच्याही कामाला येत नाही. अविचाराने वागणारा व्यक्ति काम, क्रोध, मोहात अडकत असतो. ज्यामुळे त्याच्यात मी निर्माण होतो. मी निर्माण झाला म्हणजे काम, क्रोधाची गती वाढते. या वाढत्या गतीमुळे माणूस, माणुसकीपासून दूर जातो. चांगल्याप्रकारे तो कोणाच्याही मदतीला येत नाही. केवळ स्वार्थात व अभिमानात गुरफटत गेल्याने त्यांना स्वत:शिवाय इतरांचे हित अहित लक्षात येत नाही. शरीरांच्या अवयवांकडून व मनाकडून इतरांसाठी त्यांच्याकडून चांगले कांही घडत नाही. म्हणून अशा अविवेकी, अविचारी लोकांच्या जगण्याला कांही अर्थ राहत नाही असे भगवंतांनी स्पष्ट केले. आपणही थोडा विचार करायला हवा. आपल्या आवती - भोवती असण-यांना आपण आवश्यकते प्रमाणे तरी मदत करतो का? ईश्वराचा अंश पाहायचा असेल तर तो प्राणिमात्रात पाहतो का? या प्रश्नाची उत्तरे आपण आपल्या वर्तनातून शोधायला हवी. आपण माऊलींच्या विचारांच्या, मार्गदर्शनाच्या सहवासात राहाणारे असल्याने माऊलीप्रमाणे आपणही सर्व प्राणीमात्रात ईश्वर पाहणारे आहोत हे विसरता कामा नये. आपण जर हे विसरलो तर आपल्यात आणि अविवेकी व्यक्तिमध्ये फरक तो काय असणार आहे ? सर्व प्राणीमात्र एकाच ईश्वराचे अंश आहेत असे पाहण्याची आपली जबाबदारी व आपले कर्तव्य आहे., याची जाण आपण ठेवायला हवी. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. १४ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - चैत्र कृ. द्वादशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- शततारा (१६.०५)
योग - शुक्ल (१५.३८)
करण - कौलव (१२.४६)
राहू काळ : मंगळवार
दु. ३.०० ते ४.३०

**दिनविशेष :**
**१८९१: भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म.**
**१९१२: टायटॅनिक जहाज अटलांटिक महासागरात हिमखंडाला धडकले.**
**१९५०: भारतीय तत्त्वज्ञ रमण महर्षी यांचे निधन.**
**१९६२: सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचे निधन.**
**१९६३: इतिहासकार व बौद्ध धर्म अभ्यासक राहुल सांकृत्यायन यांचे निधन.**

# जि.प. मुख्य इमारतीला अखेर मालकीचा दर्जा?

## शासनाकडे प्रस्ताव; निर्णय लवकरच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेची मुख्य इमारत ज्या जागेवर उभी आहे, ती जमीन अद्यापही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावे असल्यामुळे अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ही जागा जिल्हा परिषदेच्या नावे करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावावर लवकरच शासनस्तरावर निर्णय होण्याची शक्यता असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्हा परिषदेसह दक्षिण सोलापूर पंचायत समिती आणि इतर संबंधित कार्यालयांच्या इमारतींचा या प्रस्तावामध्ये समावेश करण्यात



आला आहे. सध्या या जागांची सातबारा उताऱ्यावर नोंद जिल्हा परिषदेच्या नावावर नसल्याने भविष्यात विविध विकासकामे, दुरुस्तीची कामे तसेच नवीन प्रकल्प राबविताना अडचणी निर्माण होत होत्या.

ही बाब लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पदभार स्वीकारल्यानंतर या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले. यापूर्वी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या कार्यकाळात या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली होती.

मात्र, आता या प्रस्तावाला अंतिम स्वरूप देत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाकडे पाठविण्यात आले आहे. जिल्हा परिषद हद्दीतील सर्व इमारती, मोकळ्या जागा, बगीचे तसेच दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या कार्यालयाच्या जागेचाही या प्रस्तावात समावेश करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने हा प्रस्ताव सादर करण्यात आल्यामुळे प्रक्रिया वेगाने पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> सदरची जागा जिल्हा परिषदेच्या नावे झाल्यानंतर प्रशासनाला विविध विकासकामे राबविणे, नवीन इमारतींचे आराखडे तयार करणे तसेच आवश्यक सोयी-सुविधा वाढविणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजाला गती मिळण्याची शक्यता असून, भविष्यातील नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### अहंकाराचा त्याग हाच यशाचा खरा मंत्र



स्वत:च्या अंतरात्म्याचा आवाज ऐका, अहंकाराचा त्याग करा आणि दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव ठेवून निर्णय घ्या; कारण करुणा, क्षमा आणि अहिंसा यांतच जीवनाचे खरे सौंदर्य दडलेले आहे, असा मोलाचा जीवनमंत्र परमपूज्य मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी वालचंद शिक्षण समूहातील विद्यार्थ्यांना दिला.

स्व. भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित प्रबोधनपर कार्यक्रमात त्यांच्या अमृतवाणीने डब्ल्यू. आय.टी. जैन टेंपलसह परिसर अध्यात्मिक तेजाने उजळला. या कार्यक्रमात त्यांनी आत्मजागरूकता, आत्मविश्वास, संयम, करुणा आणि जैन धर्मतत्त्वांवर प्रभावी मार्गदर्शन केले. प्रत्येक व्यक्तीमध्ये अमर्याद शक्ती दडलेली असते; ती जागवण्यासाठी स्वत:वर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. इतरांच्या मतांपेक्षा अंतरात्म्याचा आवाज महत्त्वाचा आहे, असे ते म्हणाले.

जीवनात कोणताही निर्णय घेताना योग्य किंवा अयोग्य भीतीमुळे निर्णय टाळतात; मात्र विवेक, धैर्य आणि संयम यांच्या आधाराने घेतलेले निर्णयच यशाकडे नेतात, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, अहिंसा, अनेकांतवाद, अपरिग्रह आणि परोपकार या जैन मूल्यांच्या आधारे निर्णय घेण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

जीवनातील प्रत्येक निर्णय केवळ स्वत:च्या फायद्यासाठी नसून दुसऱ्याच्या कल्याणासाठी असावा,ह्य असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मपरीक्षणाचा मंत्र दिला. ह्नस्वत:चे गुण-दोष ओळखा, दोषांवर मात करा आणि सामर्थ्याला योग्य दिशा द्या, असे आवाहन त्यांनी केले. शंका-समाधान सत्रात घरातील तणावाविषयी विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी सांगितले, अहंकार दूर झाला, तर घर स्वर्गसमान बनते. नम्रता, क्षमा आणि समजूतदारपणामुळेच नात्यांमध्ये सौहार्द वाढते, असा संदेश त्यांनी दिला.

# नेहरु वसतिगृहाच्या जागेवर सत्ताधाऱ्यांचा डोळा

## शिवसेनेचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गोरगरीब आणि शेतकरी पुत्रांच्या शिक्षणासाठी आधारवड ठरलेले नेहरू वसतिगृह हटवून त्या ठिकाणी शॉपिंग सेंटर उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. जिल्हा परिषदेचा हा निर्णय विद्यार्थी हिताचा नसून, मोक्याच्या जागेवर सत्ताधारी पक्षाचा डोळा असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेनेने केला आहे. या संदर्भात शिवसेनेच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना निवेदन देऊन निषेध नोंदवण्यात आला.

जिल्हा परिषद ही कोणतीही नफा कम ावणारी व्यापारी संस्था नाही. सध्याच्या नेहरू



वसतिगृहाच्या तळमजल्यावर अनेक बड्या पुढाऱ्यांच्या संस्था आणि कार्यालये आहेत, ज्यांचे भाडे जाणीवपूर्वक थकवले जात आहे. या गाळ्यांचे भाडे 'रेडी रेकनर' दराप्रमाणे वसूल केल्यास त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातूनच वसतिगृहाचे आधुनिकीकरण शक्य आहे.

मात्र, तसे न करता शॉपिंग सेंटरचा घाट घातला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

यावेळी प्रताप चव्हाण, महेश धाराशिवकर, बाळासाहेब गायकवाड, दत्ता माने, राजू कुसेकर, संताजी भोळे, राम वाकसे, शिवाजी निळ उपस्थित होते.

या आंदोलनामुळे आणि निवेदनामुळे नेहरू वसतिगृहाचा प्रश्न आता अधिक पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## राजेश गवळी यांची जिल्हाळा शेतकी कर्मशाळेस भेट

**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**

जिल्हाळा संस्थेच्या अंत्रोळी येथील शेतकी कर्मशाळेस पुणे येथील अतिरिक्त आयकर आयुक्त राजेश गवळी आणि त्यांचे सहकारी सहाय्यक आयुक्त सुभाष पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. गवळी यांनी शेतकी कर्मशाळेत सर्व विभागाची पाहणी केली. शेतकी कार्यशाळेतील प्रौढ लाभार्थ्यांबरोबर संवाद साधून ७५ चादरी त्यांनी विद्यार्थ्यांना भेट दिल्या. त्यांच्या या भेटी दरम्यान संस्थेचे संस्थापक ए.बी. राजमाने, व्यवस्थापकीय अधिक्षक शेखर बसाटे उपस्थित होते.

# भाजपा शहर उत्तर पश्चिम मंडलतर्फे प्रशिक्षण महाअभियान उत्साहात

## अमित कामतकर, ॲड. मंजुनाथ कक्कळमेली, मोहन डांगरे आणि रामचंद्र जन्नू यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

भाजपा शहर उत्तर पश्चिम मंडलतर्फे रविवारी मनोहर सांस्कृतिक भवनमध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान उपक्रम झाला. या महाअभियानाचे उद्घाटन आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर अमित काम तकर, ॲड. मंजुनाथ कक्कळमेली, भाजपाचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे, माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, देविदास चेळेकर, प्रशांत फतेपुरकर, शहर उत्तर पश्चिम मंडलाचे मंडल अध्यक्ष देविदास बनसोडे, महिला मोर्चा शहर उपाध्यक्ष उत्तरा बरडे, भाजपाचे नगरसेवक सुनिल खटके, गणेश वानकर, श्रद्धा पवार, अलका भवर, मृण्मयी गवळी, सोनाली गायकवाड उपस्थित होते.



या प्रशिक्षण महाअभियानात अमित कामतकर यांनी एआय या विषयावर, भाजपाचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे यांनी वैचारिक अधिष्ठान या विषयावर, ॲड. मंजुनाथ कक्कळमेली यांनी कार्यपद्धती आणि एसआयआर या विषयावर तर रामचंद्र जन्नू यांनी भाजपाचा इतिहास या विषयावर भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आमदार विजयकुमार देशमुख यांनीही भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

ॲड. मंजुनाथ कक्कळमेली म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पार्टी सत्तेत आहे. साहजिकच भाजपा कार्यकर्त्यांची जबाबदारी देखील मोठी आहे. त्यामुळे सक्षम कार्यकर्ता निर्मितीसाठी भारतीय जनता पार्टीमध्ये नियमितपणे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते.

भाजपाचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे म्हणाले, हिंदुत्वाची, राष्ट्रभक्तीची विचारधारा समाजात रुजवण्यासाठी भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली आहे. भाजपाला सत्तेची आवश्यकता स्वार्थासाठी नसून समाज परिवर्तनासाठी आहे. असंख्य कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे भाजपाची सत्ता आली आहे. मंडल स्तरावर कार्यकर्त्यांनी वरिष्ठ स्तराप्रमाणेच पूर्व नियोजन, पूर्ण नियोजन अशा पद्धतीने भाजपचे काम करावे, असे आवाहनही भाजपा उपाध्यक्ष मोहन डांगरे यांनी केले.

अमित कामतकर म्हणाले, सध्याच्या डिजिटल युगात माहितीचे महत्व मोठे आहे. आजवर जगभरात जमवलेल्या समाज माध्यम ांवरील माहितीमुळे आपल्याला एआयद्वारे माहिती मिळत आहे. भाजपा कार्यकर्त्यांनी नमो ॲप मधील नमो एआय हे टूल वापरून मोदी सरकारच्या विकासात्मक कार्यांची माहिती घ्यावी, असेही अमित कामतकर यांनी सांगितले.ॲड. मंजुनाथ कक्कळमेली म्हणाले, भाजपा कार्यकर्त्यांनी स्वत:ला सर्वार्थाने स्वयंपूर्ण आणि जागरूक ठेवावे. त्यासाठी कार्यकर्ता प्रशिक्षित असण्याची आवश्यकता आहे. पक्षाच्या बैठकांना, कार्यशाळांना कार्यक्रमांना नियमितपणे उपस्थित राहण्यातून कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आणि विकास होतो. भाजपा कार्यकर्त्यांनी सरकारने केलेली कामे समाजापर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही ॲड. कक्कळमेली यांनी याप्रसंगी केले. सुजितकुमार चौगुले यांनी सूत्रसंचालन तर ओंकार मुरळे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख आणि पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## धर्मण्णा सादूल प्रशालेत महात्मा फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

निलम नगर भाग ३ व ४ येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आशा मराठी विद्यालय, श्री धर्मण्णा सादूल प्रशाला व रणजितसिंह मोहिते-पाटील बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी करण्यात आली.

प्राथमिक मुख्याध्यापिका पठाण तस्लिमबानो यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष आसिफ पठाण, मुख्याध्यापिका आफरीन सय्यद उपस्थित होत्या. सूत्रसंचालन श्रीशैल जळकोटे यांनी केले तर आभार संतोष सोडडे यांनी मानले.

# संविधानामुळेच भारताची एकात्मता, अखंडता कायम : प्रा. भारतीय

## सम्यक विचार मंचतर्फे मिलिंद व्याख्यानमाला : पुष्प दुसरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**



एकात्मता म्हणजे वैचारिक एकता, बंधुता आहे. भारतात विविध जाती, धर्म, पंथ असुनसुध्दा भारताची एकात्मता आणि अखंडता ही केवळ संविधान आणि विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्वत्तेमुळेच टिकून आहे. कुणीही या देशाची अखंडता नष्ट करू शकत नाही, असे प्रतिपादन प्रा. पंकज भारतीय (अमरावती) यांनी केले.

येथील सम्यक विचार मंचतर्फे दि. ११ ते १४ एप्रिल या कालावधीत रोज ६.३० वाजता डॉ. फडकुले सभागृहात मिलिंद व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प रविवारी प्रा. पंकज भारतीय (अमरावती) यांनी 'भारतीय संविधान आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर गुंफले. अध्यक्षस्थानी जेष्ठ शल्य विशारद डॉ. औदुंबर मस्के होते. विचार मंचावर शांतीकुमार कांबळे रमेश सुरवसे उपस्थित होते. प्रा. पंकज भारतीय यांनी रोखठोक शब्दात आपल्या विषयाची मांडणी केली. देशभरात मोठ्या प्रमाणात संविधान पुस्तके उपलब्ध आहेत मात्र संविधान हे अनेकांनी शोकेसमध्ये ठेवले आहे या संविधानाची अंमलबजावणी आणि आचरण करणे हेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होते. ४२ वी घटनादुरुस्ती करून एकात्मता हा शब्द वाढविण्यात आला. वास्तविक पहाता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना याची जाणीव होतीच मात्र त्यांनी एकात्मता या शब्दाला पर्यायी शब्द संविधानात एकता हा शब्द दिला. यामुळे एकात्मता हा शब्द समाविष्ट करण्याची नंतर गरज नव्हती. भारतीय संविधानाची अंमलबजावणी होऊन ७६ वर्ष लोटले आहेत. संविधानातील कलम चार मध्ये भारत अखंड असेल असे नमूद केले आहे. ही अखंडता केवळ डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळेच टिकून आहे अन्यथा देशाचे अनेक तुकडे झाले असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन अनेक जण मोठे झाले मात्र चळवळीसाठी झटतो का ? योगदान देतो का? तर त्याचे उत्तर नाही असे खेदाने नमूद करावे वाटते. याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे. आंबेडकरी विचारसरणी अंगीकारली पाहिजे. चळवळीसाठी योगदान देणे ही खरी गरज आहे, असे आवाहन यावेळी प्रा. पंकज भारतीय यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर अंजना गायकवाड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय विजयानंद भालशंकर यांनी करून दिला.यावेळी सुधीर चंदनशिवे, चंद्रकांत कोळेकर, रविकांत दावरे, शांतीकुमार कांबळे, अनिल जगझाप, मिलिंद ताकपेरे, वसंत कांबळे उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे 'सेवासंगम' उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या सोलापूर जिल्हातर्फे रविवारी शिवस्मारक सभागृहात सेवा संगम कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमात सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या अनेक सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समरसता गतीविधी प्रमुख डॉ. रमेश पांडव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रांत सेवा प्रमुख शैलेंद्र बोरकर, जिल्हा संघचालक सी.ए. सुनील इंगळे, शहर संघचालक राजेंद्र काटवे उपस्थित होते. याप्रसंगी रमेश पांडव यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रवास उपस्थितांना उलगडून सांगितला. तसेच राष्ट्रीय सेवा संघातर्फे देशभरात सुरू असलेल्या विविध सेवाकार्यांची माहितीही त्यांनी आपल्या बीज भाषणात दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सी. ए. सुनील इंगळे यांनी पंचपरिवर्तन या विषयावर मार्गदर्शन केले. प्रांत सेवा प्रमुख शैलेंद्र बोरकर यांनी समारोप केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशभरात सेवा कार्य पोहोचवले आहे. या सेवा कार्यामध्ये समाजानेही सहभाग घ्यावा.

यावेळी विविध सेवाभावी संस्थांचे १९० प्रतिनिधी उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सोलापूर जिल्हा सेवा प्रमुख करपे यांनी प्रास्ताविक तर संगीता कोरे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी सेवाभारतीचे अध्यक्ष राजेश पवार, सचिव बाबुलाल वर्मा, उद्योगवर्धिनीच्या संस्थापिका अध्यक्षा चंद्रिका चौहान, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे सचिव मिलिंद फडके, काका महाजनी ट्रस्टचे मदन मोरे आदी उपस्थित होते.



# महापौर कोंड्याल यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

शहरातील कोंतम चौक येथे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. अनावरणानंतर पुतळ्याचे विधीवत पूजन करण्यात आले. अनावरण व पूजनाचा कार्यक्रम पार पडला.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. अनावरणानंतर पुतळ्याचे विधीवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, मनिष काळजे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, माजी नगरसेवक जगदीश पाटील, नगरसेवक अक्षय आजीखाने, नगरअभियंता सारिका आकूलवार, प्रकाश दिवानजी, आनंद मुस्तारे उपस्थित होते. कोंतम चौक परिसरात महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्यासह त्यालगत सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून पुतळ्याची दुरुस्ती करून पुनःस्थापना करण्यात आली आहे. या कामामुळे परिसराचे सौंदर्य अधिक खुलणार असून, नागरिकांच्या सोयीसुविधांचा विचार करून उर्वरित सुशोभीकरणाची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाणार आहे. महापौर विनायक कोंड्याल यांनी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये महात्मा बसवेश्वर परिसर सुशोभीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### भीम प्रतिष्ठानतर्फे श्रमिक पत्रकार संघास संविधान प्रास्ताविका भेट

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

भीम प्रतिष्ठानतर्फे महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून भेट संविधानाची. या उपक्रमाअंतर्गत सोलापूर श्रमिक पत्रकार संघास संविधान प्रास्ताविका भेट देऊन या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थेचे संस्थापक दलितमित्र बाबा बाबरे, अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार अविनाश कुलकर्णी आणि श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे यांना संविधान प्रास्ताविका सुपूर्द करण्यात आली. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव अकबर शेख, कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमांतर्गत भीम प्रतिष्ठानतर्फे शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, महामंडळ कार्यालये, विविध सामाजिक संस्था आणि मंडळांना संविधानाची प्रास्ताविका संस्थेच्या मार्फत भेट देण्यात येत आहे. भेट दिल्यानंतर संविधानावर एक व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना शालेय जीवनामध्ये संविधानाची ओळख आणि संविधानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी या उपक्रमाचे प्रामुख्याने सुरुवात केली आहे. कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. याप्रसंगी सुनील धरणे, संयोजक अमित बाबरे, उपाध्यक्ष ॲड.विशाल मस्के, कायदेशीर सल्लागार ॲड. स्वाती मस्के उपस्थित होते.



### ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये अभिव्यक्ती सादरीकरण कार्यक्रम

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**


विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा या उद्देशाने ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये इ.५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभिव्यक्ती वर्गाचे आयोजन केले जाते. विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या कलेची निवड करुन साप्ताहिक तासिकांमध्ये त्या केलेचे प्रारंभिक शिक्षण घेतात. यासाठी सोलापुरातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन त्यांना लाभते. या कलांमध्ये तबला, गिटार, संवादिनी, अभिनय, चित्रकला, शिल्पकला, कथक, भरतनाट्यम, गायन या कला विद्यार्थी शिकत आहेत. दि. १३ एप्रिल रोजी यंदाच्या अभिव्यक्ती वर्गाचे सादरीकरण संपन्न झाले. यामध्ये विद्यार्थ्यांनी कथक प्रकारात श्रीकृष्णांच्या गीतावर आधारित नृत्य सादर केले. गिटार वाद्य प्रकारात अच्युतम् केशवमैं् हे गीत सादर केले. गायनातील मिश्र पहाडी राग तसेच अभिनयातील गटाने ैंसुदाम्याचे पोहेैं हे नाट्य सादर केले. तर भरतनाट्यम प्रकारातून ैंवसुदेव सुतम देव, हनुमान चालीसा, वंदे मातरमैं् हे गीत सादर केले. चित्रकलेमध्ये विविध माध्यमातील कोलाज चित्रे रेखाटली व शिल्पकलेमध्ये विविध शिल्प तयार केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पोदार हायस्कूलचे संगीत शिक्षक नागेश पवार उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे कौतुक करताना त्यांनी ज्ञान प्रबोधिनीत शिकणारी मुले भाग्यवान आहेत. इतक्या लहान वयामध्ये या कला शिकायला मिळतात असे सांगत विद्यार्थ्यांचे, पालकांचे, अध्यापकांचे व प्रशालेचे कौतुक केले. यावेळी संस्थेचे सहकार्यवाह अमोल गांगजी, विश्वस्त श्रीरंग कुलकर्णी तसेच प्रशालेच्या मुख्याध्यापिका प्रवीणा काळे, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा रुपाली कुलकर्णी उपस्थित होते.

### करमाळ्यात हनुमान चालीसा पठणाचे १५१ आठवडे पूर्ण

**करमाळा, दि. १३ एप्रिल-**



करमाळा तालुक्यात सुरू असलेल्या हनुमान चालीसा पठण उपक्रमाने सलग १५१ आठवड्यांचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केला असून, या निमित्ताने संपूर्ण तालुक्यात भक्तीचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे. सुरुवातीला केवळ १३ भक्तांच्या उपस्थितीत सुरू झालेला हा उपक्रम आज भव्य स्वरूप धारण करून ४० पेक्षा अधिक गावांमध्ये पोहोचला आहे. दर शनिवारी ५००० हून अधिक भक्त या उपक्रमात सहभागी होत असून, करमाळा तालुका भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघत आहे. या यशामागे हिंदू समाजाची एकजूट आणि श्रद्धा हेच मुख्य बळ ठरले आहे. समाज एकत्र आल्यानेच हा उपक्रम इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. करमाळा शहरातील मारुती मंदिरात दर शनिवारी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे हा महाप्रसाद उपक्रमही अखंडपणे सुरू असून, भक्त मोठ्या भक्तिभावाने त्याचा लाभ घेत आहेत.



### कुर्डुवाडी काँग्रेस कमिटी अल्पसंख्यक विभागातर्फे महात्मा फुले यांना अभिवादन

**कुर्डूवाडी, दि. १३ एप्रिल-**

कुर्डुवाडी काँग्रेस कमिटी अल्पसंख्यक विभाग यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जेष्ठ नेते वलीमोहम्मद मुलाणी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शहराध्यक्ष दत्ताजी गवळी, नगरसेवक मुलाणी, काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष फिरोज खान, काँग्रेस अल्पसंख्यक शहराध्यक्ष हमीद शिकलकर, ॲड. बी. एस.बागल, जावेद शिकलकर, सिद्धार्थ झिंगले, किशोर कीर्वे, युवक नेते रवी आठवले, उमाकांत पारखे, शाबीर शिकलकर, किशोर हजारे उपस्थित होते. हमीद शिकलकर यांनी आभार मानले.

# मंथन राज्यस्तरीय स्पर्धेत 'सुयश'चे यश



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ एप्रिल-**

बार्शी येथील सुयश विद्यालयातील इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत यश संपादन करत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

इयत्ता पहिलीचे गुणवंत विद्यार्थी वेदिका मोरे १४८ गुण (राज्यात दुसरी), राजवीर गोरे १४६/१५० (राज्यात तिसरा), सानवी गाढवे १४६/१५० (राज्यात तिसरी), कार्तिकी नागरगोजे १४४/१५० (राज्यात चौथी), संस्कृती अमराळे १४२/१५० (राज्यात पाचवी).

इयत्ता दुसरीचे विद्यार्थी विराज ठोंगे १५०/१५० (राज्यात पहिला), राजवीर नलवडे १४८/१५० (राज्यात दुसरा), परिणीती महाले १४८/१५० (राज्यात दुसरी), नक्षत्रा जगदाळे १४६/१५० (राज्यात तिसरी), अमित मुंडे १४६/१५० (राज्यात तिसरा), श्रेयश सुरवसे १४४/१५० (राज्यात चौथा), शांभवी मंडगे १४२/१५० (राज्यात पाचवी). इयत्ता तिसरी- सुबोध शेळवणे २८४/३००. जिल्ह्यात तिसरा, ज्ञानेश जाधव २८२/३०० जिल्ह्यात चौथा इयत्ता चौथी आर्या बाशिंगे. २९०/३०० राज्यात सहावी जिल्ह्यात प्रथम विराज आवटे. २८२/३०० राज्यात दहावा जिल्ह्यात पाचवा क्रमांक. इयत्ता पाचवी वेदिका ठोंगे - २९६/३००, राज्यात दुसरी, ऋतुराज घोळवे - २९२/३००, राज्यात चौथा, आरुषी जाधव २९२/३००, राज्यात चौथी, शौर्य घोळवे २८८/३०० राज्यात- सहावा, जिल्ह्यात प्रथम, प्राजक्ता राक्षे २८४/३०० राज्यात आठवी, जिल्ह्यात तिसरी इयत्ता सहावी कृष्णमेघ निकम २८०/३०० जिल्ह्यात पहिला राज्यात ७ वा, स्वरा इतापे २७४/३०० जिल्ह्यात तिसरी राज्यात १० वी. इयत्ता सातवी गिरीश देवकर २६४/३०० जिल्ह्यात ४ था राज्यात १४ वा. इयत्ता आठवी ऊर्विच दराडे २७८/३०० जिल्ह्यात पहिला राज्यात आठवा, सर्वज्ञ खराडे २७६/३०० जिल्ह्यात दुसरा राज्यात नववा, पृथ्वीराज मुके २६८/३०० जिल्ह्यात ४ था राज्यात १२ वा, तेजस जाधवर २६६/३०० जिल्ह्यात पाचवा राज्यात १४ वा. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, मुख्याध्यापिका अलका जगताप तसेच उपमुख्याध्यापक येवले यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची प्रगती नाही

### जि. प. सदस्य नेताजी खंडागळे ; क्रांतीसूर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

'विद्येविना मती गेली, मती विना निती गेली, निती विना गती गेली, गती विना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले,' असा महात्मा फुले यांचा दृष्टीकोन होता, म्हणूनच शिक्षण महत्वाचे आहे. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची प्रगती होणार नाही, असे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे यांनी व्यक्त केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षिहिप्परगे येथील महात्मा फुले तरुण मंडळाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची जयंती आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरी करण्यात आली. प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन बोरामणी गटाचे नूतन जिल्हा परिषद सदस्य खंडागळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नेताजी खंडागळे बोलत होते. खंडागळे यांनी त्यांच्या भाषणात, शिक्षणाचं महत्व अधोरेखित करताना, महात्मा फुले यांच्या जीवनातील अनेक प्रसंगांना उजाळा दिला. अन्य उपस्थित मान्यवरांनीही आपल्या मनोगतात महात्मा फुले यांच्या जीवन कार्याचा आलेख मांडला.

या कार्यक्रमाचे आयोजन तुकाराम माळी यांनी केले होते. यावेळी विचारपीठावर ग्रामपंचायत सरपंच, सर्व सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाला गावकरी महिलांची उल्लेखनिय उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण माळी, गोपाळ माळी, नवनाथ माळी, सिताराम माळी, नामदेव माळी, गणपत माळी, उमराबाई लक्ष्मण माळी, वैशाला नवनाथ माळी, अमोल माळी, खंडू माळी, नामदेव माळी, दादासाहेब नामदेव माळी आदींनी परिश्रम घेतले.

# एमआयटीमध्ये करिअर मार्गदर्शन आणि एनडीए तयारी, प्रशिक्षण अनावरण समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ एप्रिल-**

येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल कॅम्पसमध्ये एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या एनडीए परीक्षा तयारी आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचा अनावरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी आयोजित दहावीनंतरचे करिअर विषयक चर्चासत्रात प्रसिद्ध शिक्षणतज्ञ व करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर व कर्नल डी. के. उपाध्याय यांनी करिअरच्या विविध पर्यायांविषयी आणि संरक्षण क्षेत्रातील करिअरविषयी विशेष मार्गदर्शन केले.

ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना योग्य करिअरची दिशा मिळावी तसेच देशसेवेबरोबरच संरक्षण क्षेत्रातील उच्च करिअरच्या संधी याविषयी आवश्यक मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांचा



उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे विवेक वेलणकर, वाखरी येथील एमआयटी शैक्षणिक संकुलाचे सहसंचालक कर्नल डी. के. उपाध्याय, विश्वशांती गुरुकुलचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ, हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी व ज्युनिअर कॉलेजचे ग्रुप मार्केटिंग व्यवस्थापक योगेश नागपाल उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. स्वप्नील शेठ यांनी केले. यानंतर कर्नल डी. के. उपाध्याय यांनी संरक्षण दलातील आर्मी, नेव्ही व एअरफोर्स अशा तिन्ही विभागातील करिअर संधी आणि देशसेवेबरोबरच मिळणाऱ्या सुविधा व मानसन्मान याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी एनडीए मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आवश्यक असलेली शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक तयारी आणि नेतृत्वगुण यांचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये संरक्षण क्षेत्राबद्दल आकर्षण अधिक दृढ झाले. प्रमुख वक्ते विवेक वेलणकर यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवडताना केवळ पारंपरिक पर्यायांचा विचार न करता आपल्या आवडी, क्षमता, कौशल्ये आणि बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेऊन करिअर निवडण्याचा सल्ला दिला.

यावेळी त्यांनी एनडीए प्रवेश प्रक्रिया, लेखी परीक्षा, एसएसबी मुलाखत आणि प्रशिक्षण याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्राची बिडवे यांनी केले, नारायण देशपांडे व तानाजी डुबल यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली तर वीरेंद्र बावस्कर यांनी आभार मानले.



# जि.प. अध्यक्षांनी केला गुणवंताचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेचे नूतन अध्यक्ष दिपक वैद्य यांनी अचानक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो) शाळेस भेट दिली. यावेळी सर्व वर्गातून मराठी विषयाची पीटी परीक्षा चालू होती. परीक्षा अतिशय सुरळीत चालू होती हे पाहून अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले.

त्यानंतर अध्यक्ष झाल्यानंतर प्रथमच शाळेला भेट दिल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अनिल काळे यांनी त्यांचा सत्कार केला. त्यांचे समवेत उपस्थित असलेले गावचे माजी उपसरपंच आण्णासाहेब लुंगसे यांचाही शाळेच्यावतीने सत्कार करण्यात आला. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत जिल्हा परिषद शाळेतून एकमेव पात्र ठरलेला तसेच सैनिक स्कुलसाठी निवड झालेला विध्यार्थी सर्वज्ञ सतीश वाघ याचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मल्हार अनंत सदावर्ते, ऋषिकेश बरचे यांचा सैनिक स्कुलसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. विध्यार्थी व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत चित्रकला स्पर्धेत तालुक्यात द्वितीय आलेली सानिका ठोंगे व निबंध स्पर्धेत तालुक्यात द्वितीय आलेली अंजली भोंग हिचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नन्हे सितारे या जिल्हा परिषदेच्या या अभिनव उपक्रमात शाळेतील विद्यार्थिनी आरोही संतोष पाटील ही स्पोकन इंग्लिशमध्ये जिल्ह्यात दुसरी आली तसेच समृद्धी सचिन शिंदे ही कविता गायन स्पर्धेत तालुक्यात प्रथम आली. तसेच मल्हार सदावर्ते हा विध्यार्थी कथाकथन स्पर्धेत प्रथम आला त्याबद्दल या सर्व विध्यार्थ्यांचा अध्यक्ष दिपक वैद्य यांनी सत्कार केला. तसेच या विद्यार्थ्यांसाठी प्रामाणिक व मनापासून काम केलेल्या दिपाली गोरे यांचाही अध्यक्षांनी सत्कार केला. यावेळी शाळेतील शिक्षक प्रभाकर काटे, आनंद घाडगे, रामचंद्र बरचे, हरिभाऊ दळवी, सुवर्णगौरी शिंदे, मीरा गरड, बेबीनंदा खडबडे, वैशाली खुने, दिपाली गोरे उपस्थित होत्या.

# गुरुवारपासून बसव व्याख्यानमाला

### तीन दिवस सोलापूरकरांना मिळणार वैचारिक मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

जगदज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही १६ ते १८ एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी ६ वाजता शिवस्मारक सभागृहात बसव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदाचे व्याख्यानमालेचे १२ वे वर्ष असून या तीनदिवसीय बसव व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुरुवार १६ एप्रिल रोजी हास्यकवी अनिल दीक्षित व भालचंद्र कोळपकर (पुणे) हे 'हास्यरंग या विषयावर गुंफणार आहेत. या पहिल्या पुष्पाचे उद्घाटन आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते आणि पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, सोलापूर नागरी बँक सहकारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले व नगरसेवक अमोल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. दुसरे पुष्प १७ एप्रिल रोजी अपेक्षा चाकोते (मुंबई) या गुंफणार असून 'स्त्री स्वातंत्र्याचे उद्गाते : महात्मा बसवेश्वर' या विषयावर गुंफणार आहेत. दुसऱ्या पुष्पाचे उद्घाटन पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील यांच्या हस्ते व उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, समाजसेविका उज्वला सोपल, जनता बँकेच्या संचालिका चंद्रिका चव्हाण व श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका इंदुमती अलगोंडा-पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. व्याख्यानमालेचा समारोप १८ रोजी प्रा. डॉ. गणेश बेळंबे (लातूर) यांच्या ऐसे कैसे झाले भोंदू या विषयावर होणार आहे. समारोपाच्या पुष्पाचे उद्घाटन आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते व आ. देवेंद्र कोठे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी महापौर विनायक कोंड्याल, उपमुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार व जिल्हा परिषदेचे सभापती रामपाल चिवडशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. व्याख्यानमालेस उपस्थित राहणाऱ्या श्रोत्यांमधून दररोज ५ श्रोत्यांना सोडतीद्वारे भेटवस्तू देण्यात येणार आहे. तरी सोलापूरवासियांनी या बसव व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस नागेश बडदाळ, आनंद दुलंगे, सोमेश्वर याबाजी, राजेश नीला, अविनाश हत्तरकी, सोमनाथ चौधरी आदी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेत कार्यक्रमांची मेजवानी

### प्रबोधन, भीमगीते व विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने १४ एप्रिल रोजी विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद परिसरातील संविधान कोनशिलेपासून ते यशवंतराव चव्हाण सभागृहापर्यंत दिवसभर विविध उपक्रमांची रेलचेल राहणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता जिल्हा परिषद आवारातील संविधान कोनशिलेस पुष्प अर्पण करून मान्यवरांच्या अभिवादनाने होणार आहे. त्यानंतर यशवंतराव चव्हाण सभागृहात 'समता रजनी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, भीमशाहीर संदिप शिंदे प्रबोधन मंच यांच्या वतीने भीमगीते सादर करण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना अभिवादन करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. यावेळी संविधान उद्देशिका वाचनही करण्यात येणार आहे. तसेच 'राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर पुणे येथील व्याख्याते निलेश विमल धायरकर यांचे प्रबोधनपर व्याख्यान होणार आहे. समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांचा यावेळी प्रतिनिधिक सत्कारही करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर पार्क चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यवरांकडून पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते, कृषी व पशुसंवर्धन सभापती रामप्पा चिवडशेट्टी, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार, महिला व बालकल्याण सभापती ॲड. अमृता वाघे उपस्थित राहणार आहेत. हा संपूर्ण कार्यक्रम जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे.

सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने तालुकास्तरावरही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. इयत्ता ७ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी १४ एप्रिल रोजी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. आंबेडकरांचे विचार, महिलांच्या उन्नतीसाठी त्यांचे योगदान, महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व तसेच संत गाडगे महाराज यांच्या कार्यावर आधारित विषय या स्पर्धेसाठी निवडण्यात आले आहेत. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ११ हजार, ९ हजार व ७ हजार रुपयांची रोख पारितोषिके आणि प्रशस्तीपत्रे १ मे रोजी महाराष्ट्र दिनी प्रदान करण्यात येणार आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महावितरणतर्फे जिल्ह्यात उद्या ग्राहक तक्रार निवारण दिन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ एप्रिल -**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये बुधवारी १५ एप्रिल रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केल्याची माहिती अ.भा.ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंत ग्राहकांनी उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी.

यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहा.अभियंता हे अधिकारी समक्ष उपस्थित राहून तक्रारी, अडचणी तसेच समस्या सोडविणार आहेत. कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने,अ.भा. ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा कोषाध्यक्षललिता वांगडे, जिल्हा सदस्य पांडुरंग अल्लापूरकर, अण्णा ऐतवाडकर, जिल्हा मध्यस्थता कक्षाचे सदस्य संभाजी लंगोटे यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### भगवंत प्राप्तीसाठी भगवंताचे नामस्मरण आणि श्रीमद् भागवत कथेचे श्रवण करा

**बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर**

**मोडनिंब, दि.१३ एप्रिल-**

भगवत प्राप्तीसाठी दोन प्रमुख उपाय म्हणजे भगवंताचे नामस्मरण आणि श्रीमद् भागवत कथेचे श्रवण होय, असे प्रतिपादन बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी केले. मोडनिंब येथे गुरुवारपासून सुरू असलेल्या भागवत कथेच्या चौथ्या दिवशीच्या कथेच्या विवेचनात त्यांनी सांगितले. चित्ताच्या ठिकाणी विषयाचे चित्र उमटते; विषयाचे चित्र वांध केल्याशिवाय जीवाला गती प्राप्त होऊ शकत नाही. संपत्तीत समाधान नाही, समाधान प्रेमात आहे. निष्ठेने धर्म आचरण करण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. खरे समाधान संपत्तीमध्ये नसून प्रेमामध्ये आहे, असेही त्यांनी नमूद केले. कोणाचा द्वेष करू नका, कुणाबद्दल वाईट विचार करू नका. उपेक्षा वृत्ती धारण करा असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रसंत सद्गुरू श्रीपादबाबा



यांच्या २८ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त या संगीतमय सप्ताह सोहळ्याचे आयोजन केले आहे. श्री संगनबसवेश्वर मठ येथे सप्ताह पार पडणार आहे. रोज सायंकाळी सात ते दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात टेंभुर्णी, मोडनिंब, अरण व बावी, गिड्डेवाडी, आष्टी, तेलंगवाडी, शेटफळ, जाधववाडी, तुळशी, बैरागवाडी,भेंड येथील हजारो भाविक सहभागी होतात. प्रासादिक अमृत वाणीतून कथा श्रवनाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### श्री भगवंत प्रगट दिनानिमित्त भजन अनावरण सोहळा २७ एप्रिलला

**बार्शी, दि. १३ एप्रिल-**

श्री भगवंत प्रगट दिनाच्या पूर्वसंध्येला भाविकांसाठी एक विशेष आध्यात्मिक कार्यक्रम २७ एप्रिल रोजी श्री भगवंत मंदिर समितीच्यावतीने आयोजिला आहे. यावेळी श्री भगवंत भक्त विजय थोरात (कोरे) यांच्या नव्या भगवंत भजनाचे भव्य अनावरण करण्यात येणार आहे. हा भजन अनावरण सोहळा श्री भगवंत मंदिर, बार्शी येथे श्री भगवंत प्रगट दिनाच्या पूर्वसंध्येला महाराजांचे प्रवचन संपल्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात गुरुवर्य ह.भ.प. डॉ. जयवंत बोधले महाराज व मा. आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते प्रोजेक्टरच्या माध्यमातून विजय थोरात यांच्या नव्या रचनेचे अनावरण करण्यात येणार आहे. या भजनाचे शीर्षक माझ्या हृदयात वसतो भगवंत व माझ्या प्रत्येक श्वासात भगवंत असे



असून, भक्तीभावाने परिपूर्ण ही रचना भाविकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. हा कार्यक्रम बार्शीच्या नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, यावेळी तहसीलदार एफ. आर. शेख, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, अमृत राऊत, सचिन वायकुळे, डिजिटल मीडिया पत्रकार संघ असोसिएशन तसेच भ्रष्टाचार निर्मूलन समिती सोलापूर यांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### खंडाळीच्या ऋतुजा पताळे पहिल्याच प्रयत्नात बनल्या महसूल सहाय्यक

**माळीनगर, दि. १३ एप्रिल-**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षेत मौजे खंडाळी (ता. माळशिरस) येथील ऋतुजा पताळे हिने पहिल्याच प्रयत्नात यश संपादन करून महाराष्ट्र राज्याच्या मंत्रालयात महसूल



सहाय्यक पदावर निवड झाली. ऋतुजा ही एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी असून तिचे प्राथमिक शिक्षण सदाशिवराव माने विद्यालय अकलूज येथे झाले असून उच्च माध्यमिक शिक्षण जिजामाता कन्या प्रशाला अकलूज येथे झाले त्यानंतर तीने पुणे येथील कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि कृषी पदवी संपादन केली. आई वडिलांच्या प्रोत्साहनातून मी क्लास थ्रीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन मंत्रालयात माझी महसूल सहाय्यक पदावर निवड झाली आहे. परंतु मी आता एवढ्यावरच न थांबता येत्या १७ तारखेला क्लास टू साठी परीक्षा देणार असल्याचे ऋतुजाने सांगितले.

### पत्रकार चंद्रकांत माने यांना राज्यस्तरीय पुरस्कार; आज वितरण

**पंढरपूर, दि. १३ एप्रिल-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान जयंती महोत्सव समिती पंढरपूर यांच्यावतीने वतीने पत्रकारिता क्षेत्रामध्ये उल्लेखनीय



कार्य केल्याबद्दल पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील पत्रकार चंद्रकांत माने यांना विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. सदर पुरस्कार सोहळ्याचे वितरण मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक (शिवतीर्थ) येथे आमदार समाधान आवताडे,आमदार अभिजीत पाटील, आमदार राजु खरे,माजी पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे,भगीरथ भालके,अनिल सावंत, मनसेचे दिलीप धोत्रे,पंचायत समिती सभापती शुभम आगावणे, नागेश भोसले,जयंती समितीचे संस्थापक अध्यक्ष डी. राज सर्वगोड यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

## तरुणीने स्वत:च ॲसिड ओतून घेतले, हल्ल्याचा रचला बनाव

**गंभीर जखमी, तरुणीवरच गुन्हा दाखल होणार..!**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ एप्रिल -**

शहरातील एका अविवाहित तरुणीच्या चेहऱ्यावर अज्ञात तरूणांनी ॲसिड टाकून हल्ला केल्याची धक्कादायक माहितीसमोर आली होती. मात्र, पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली तेव्हा तरुणीने टॉयलेट साफ करण्याचे ॲसिड विकत घेऊन ते स्वत:वरच ओतून घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही घटना रविवारी (ता.१२) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास येथील नगरपालिका परिसरात घडली होती. दरम्यान तरुणी लिव्हरच्या आजाराने त्रस्त होती. त्यामुळे मानसिक तणावातून तिने हे कृत्य केल्याचे येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी सांगितले.



ॲसिड हल्ला झालेल्या २८ वर्षीय तरुणीला शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. जखमी तरुणी भेळ आणण्यासाठी घरातून बाहेर पडली होती. रस्त्याने पायी जात असतानाच नगरपालिका इमारती जवळ मोटारसायकलवरून आलेल्या दोघा अज्ञात तरुणांनी तिच्या चेहऱ्यावर वर ॲसिड टाकले. त्यानंतर भयभीत झालेल्य तरुणीने बाजार पेठेतील एका दुकानदाराच्या मोबाईल फोनवरून हा प्रकार घरी सांगितला. त्यानंतर तत्काळ जखमी अवस्थेतील तरुणीला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. यामध्ये तरुणीच्या चेहऱ्याला गंभीर दुखापत झाल्याचे तिच्या आईने सांगितले होते. दरम्यान तरुणीची प्रकृतीस्थीर असली तरी तिच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असल्याची माहिती देण्यात आली होती.

**आजाराला कंटाळुन टोकाचे पाऊल उचलल्याची पोलिसांची माहिती**

दरम्यान पोलिसांना ॲसिड हल्ल्याच्या घटनेची माहिती मिळताच येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी त्वरीत तपासाची चक्रे फिरविली. पोलिसांनी घटना घडलेल्या ठिकाणी त्वरीत भेट देवून तेथील सीसीटिव्ही फुटेच मिळविले. सुरुवातीला तरुणीने दिलेल्या जबाबामध्ये काही विसंगती पोलिसांना आढळुन आल्या. त्या नंतर येथील निर्भया पथकाच्या प्रमुख रावण मॅडम, डॉक्टर तसेच मुलीच्या आई समक्ष मुलीची ई साक्ष घेऊन (जबाब) रेकॉर्ड करण्यात आला. त्यावेळी तिने आपण एका दुकानातून ६० रुपये देवून टॉयलेट साफ करण्याचे एक लिटर ॲसिड विकत घेऊन ज्या भागात सीसीटिव्ही नाहीत अशा ठिकाणी येवून स्वत:च्या उजव्या बाजुच्या तोंडाकडील भागावर ते ॲसिड ओतून घेतल्याची धक्कादायक माहिती दिली. ॲसिड ओतून घेण्याचे कारण सांगताना आपण लिव्हरच्या आजाराने त्रस्त असून ट्रेस खाली आहोत. त्यामुळेच आपण हे केल्याचे मुलीने सांगितल्याची माहिती येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

**गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया**

सध्या संबंधित मुलीची तब्येत ठिक आहे. डॉक्टरांनी त्वरीत उपचार केल्यामुळे तिच्या उजव्या बाजूच्या डोळ्यात जे ॲसिड गेलेले होते, ते वॉशआऊट केलेले आहे. मात्र, चेहऱ्यावर भाजल्याचे व्रण आहेत. आम्ही देखील अजून तपास करीत आहोत. संबंधित तरुणी आता पुर्णपणे फिट आहे. घटना घडल्यानंतर लगेचच आम्ही घटनेची नोंद स्टेशन डायरीला घेतलेली आहे. तिने ॲसिड कुठल्या दुकानातून विकत घेतल्याची माहिती दिलेली आहे. त्या दुकानात जावून तेथील सीसीटिव्ही फुटेज देखील मिळते आहे का ते पाहतो आहे. तपास सुरु असून त्या अनुषगाने संबंधित तरुणीवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया देखील करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### सोरेगांव व वडाळा येथे १७ एप्रिल रोजी महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १ ची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, दि. १८ फेब्रुवारी २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीकरिताची रुपरेषा निश्चित करुन देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने उत्तर सोलापूर तालुक्यातील सोरेगांव व वडाळा मंडळ स्तरावर शुक्रवार दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत समाधान शिबिराचे आयोजन करणेत आले आहे.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर आमदार उपस्थित राहणार असल्याची माहिती उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.



## हभप बाळकृष्ण इंगळे यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा : औसेकर महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

हभप बाळकृष्ण अनंत इंगळे यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे उद्गार गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी काढले. बाळकृष्ण अनंत इंगळे यांच्या एकसष्टीनिमित्त सत्कार समारंभाचे आयोजन केले होते, त्या कार्यक्रमा मध्ये ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक। या न्यायाने संतती सात्विक होणे व कर्तव्य परायण होणे हे भाग्याने घडते. जीवनात एकष्टी साजरी होणे गरजेचे आहेच पण परिवाराने साजरी करणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे मला आज या कार्यक्रमामध्ये उपस्थित असल्याचा खूप आनंद आहे. त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना उच्च शिक्षित करून वारकरी संस्कारात आणले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नगरसेवक मनीष केत (प्रदेश अध्यक्ष मराठी पत्रकार संघ) हे होते व हभप विठ्ठल चवरे महाराज, हभप अनंत इंगळे महाराज, हभप सुधाकर महाराज इंगळे, हभप जोतिराम चांगभले महाराज, हभप बळीराम जांभळे, गणेश वानकर, महादेव गवळी प्रमुख अतिथी होते. या सर्वांचा सत्कार अक्षय इंगळे, आदर्श इंगळे, अरुणा ताटे यांनी केल. श्री संत मुक्ताई मंदिर येथे कार्यक्रम संपन्न झाला. आभार हभप आदर्श महाराज इंगळे यांनी मानले.

## अखिल भारतीय हिंदुमहासभेचा स्थापना दिन हरिद्वार येथे उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ एप्रिल -**

अखिल भारतीय हिंदुमहासभेचा स्थापना दिन हरिव्दार येथे सोमवारी (दि.१३) उत्साहात संपन्न झाला. अखिल भारतीय हिंदूमहासभेचा १३ एप्रिल हा स्थापना दिन. हरिद्वार येथे १११ वर्षांपूर्वी कुंभमेळ्यात आजच्या दिवशीच अ.भा. हिंदुमहासभेची स्थापना झाली होती. त्यामुळे हरिद्वार येथेच हा वर्धापन दिन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अ.भा. हिंदुमहासभेची कार्यसमिती बैठक ही पार पडली.




या बैठकीसाठी अखिल भारतीय हिंदू महासभेचे प्रदेश पदाधिकारी अभयसिंह कुलकर्णी (इंचगावकर), अनिलराव पवार उपस्थित होते. विविध प्रदेशांतून मान्यवर व हरिद्वार निवासी, संत, महंत यांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अ.भा.हिंदूमहासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष मुन्नाकुमार शर्मा यांनी भूषविले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विरेशजी त्यागी यांनी केले. दरम्यान हरिव्दार येथील राजपूत पंचायती धर्मशाळा सभागृह यावेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खचाखच भरून गेले होते. सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत या सभागृहात भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी पार पडला.

## अरण येथे आज संत सावता महाराज चंदन उटी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१३ एप्रिल-**

श्रीक्षेत्र अरण (ता. माढा) येथे संत सावता महाराज यांच्या चंदन उटी सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. आज मंगळवारी (दि. १४) होणाऱ्या या सोहळ्यात कर्मभूषण पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.



या कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे, मंत्री अतुल सावे तसेच आमदार योगेश टिळेकर उपस्थित राहणार असून, त्यांच्या हस्ते संत शिरोमणी सावता महाराज 'कर्मभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवात भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. यंदा प्रथमच मंत्र्यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा होत असून, विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांचीही उपस्थिती राहणार आहे.दरम्यान, राज्य शासनाने अरण तीर्थक्षेत्र विकासासाठी सुमारे १५० कोटी रुपयांच्या आराखड्यास मंजुरी दिली असून, या माध्यमातून परिसराचा सर्वांगीण विकास होणार आहे. यात सांस्कृतिक सभागृह, वारकरी शिक्षण केंद्र, भक्तनिवास, पार्किंग सुविधा आदींचा समावेश आहे. गेल्या अनेक वर्षापासून अरण येथे उन्हाळ्यात ज्याप्रमाणे पंढरीच्या पांडुरंगाला दाहकता कमी व्हावी म्हणून चंदनाचा लेप लावला जातो. तसा संत सावता माळी महाराजांच्या मूर्तीस लेप लावला जाणार आहे .

## कारी येथे जुन्या वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला

**पूर्वीच्या वादाची कुरापत; सातजणांविरुद्ध पांगरी पोलिसांत गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१३ एप्रिल-**

तालुक्यातील कारी गावाच्या शिवारात वाढदिवसानिमित्त आयोजित जेवणाच्या कार्यक्रमात जुन्या वादातून एका तरुणावर सातजणांनी मिळून प्राणघातक हल्ला केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या घटनेत सकलेन सरफराज सय्यद (वय २२, रा. तावडी, ता. बार्शी) हा तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सोलापूर येथे उपचार सुरु आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, दि. ८ एप्रिल रोजी रात्री सकलेन सय्यद हा आपल्या नातेवाईकांसह कारी येथे मित्राच्या शेतात वाढदिवसानिमित्त आयोजित जेवणाच्या कार्यक्रमाला गेला होता. कार्यक्रम आटोपल्यानंतर उपस्थित काही तरुणांनी पूर्वीच्या वादाची कुरापत काढत सकलेन याला लक्ष्य केले. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच सकलेनने तेथून दुचाकीवरुन निघण्याचा प्रयत्न केला. मात्र, संशयित आरोपींनी त्याचा पाठलाग करुन त्याला अडवले व शिवीगाळ करत मारहाण सुरु केली. यावेळी रितेश पाटील व सुमित शिंदे यांनी बिअरच्या बाटल्यांनी डोक्यावर व पाठीवर वार केले, तर आदित्य साठे, मुकेश क्षीरसागर व रितेश क्षीरसागर यांनी लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान, एकाने धारदार चाकूने सकलेनच्या पाठीवर खोलवर वार करुन त्याला गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर जखमी अवस्थेत सकलेन याला प्रथम बार्शीतील जगदाळे मामा रुग्णालयात व नंतर सुविधा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्याला सोलापूर विभागात त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून, सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांकडून मिळाली आहे.

पीडिताच्या फिर्यादीवरुन पांगरी पोलीस ठाण्यात अमर हजगुडे, रोहन हजगुडे, रितेश पाटील, सुमित शिंदे, आदित्य साठे, मुकेश क्षीरसागर, रितेश क्षीरसागर या सात जणांविरुद्ध कट रचून प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पांगरी पोलिसांनी घटनेची गांभीर्याने दखल घेत आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली असून, पुढील तपास सुरु आहे.



## बाधितांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा

**पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात नगरसेवक राहुल शिंदे-नाईक उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ एप्रिल -**

येथील कॉरिडॉर नगरसेवक व नागरिकांना विश्वासात घेऊन करावा याबाबत नगरसेवक राहुल शिंदे-नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे. पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने पंढरपुरात कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे.

यासाठी पहिल्या टप्प्यात चौफाळा ते महाद्वार घाट पर्यंत कॉरिडॉर करण्यात येणार आहे. यामुळे ६५० मालमत्ता बाधित होणार आहेत. कॉरिडॉर मुळे मंदिर परिसरातील व्यापारी व नागरिकांनी विरोध दर्शवला आहे कॉरिडॉर होऊ नये यासाठी तीर्थ बचाव समितीची स्थापना करण्यात आली असून या माध्यमातून विविध आंदोलने करण्यात येत आहेत. शासनाने कॉरिडोर करण्याचा निर्णय घेतला आहे मात्र कॉरिडॉर करण्याबाबत नगरसेवक व नागरिकांना कोणतीही माहिती देण्यात येत नाही. यामुळे कॉरिडॉर बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. म्हणून कॉरिडॉर बाबतची माहिती नगरसेवक व नागरिकांना मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नगरसेवक राहुल-शिंदे नाईक यांनी निवेदन दिले आहे. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सर्वांना विश्वासात घेऊन कोणावरही अन्याय न होता पंढरपूरला जागतिक दर्जाचे तिर्थक्षेत्र करणार असल्याचे सांगितले.